# " सांगली शिक्षण संस्थेचे सामाजिक क्षेत्रातील योगदान"

*मुल्ला हसिना शमशुद्दिन*
*एम. फील.*
*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.*



**प्रस्तावना :-**

'एक शिष्य चार गुरु' या व्यस्त प्रमाणात चार ध्येयवेडया तरुणांनी एकत्र येऊन शाळा स्थापन केली होती.''

सांगली शिक्षण संस्था शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक कार्यालाही बरोबर घेऊन जात आहे. विद्यार्थी दशेतच सामाजिक क्षेत्राची आवड निर्माण करणारे उपक्रम संस्था पातळीवर व शालेय पातळीवर राबविले जाते. या संस्थेची स्थापनाच मुळात राष्ट्रप्रेमाने, राष्ट्राभिमानाने, राष्ट्रविचाराने भारावलेल्या चार ध्येय वेडया. १) स्व. धोंडो विठ्ठल सखदेव २) स्व. विनायक सदाशिव जोशी ३) ब्रहमीभूत गुरुनाथ गोविंद तोरो ४) स्व. राजाराम रावजी चिकोडीकर या संस्थापकांनी केले आहे. या संस्थेले आज १०३ वर्षात पदार्पण केले आहे. भूतकालाचा विचार करता ही संस्था ऐतिहासिक संस्था म्हणून उल्लेख करावा लागेल. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून, विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक, बौध्दिक विकासाचे उपक्रम राबविले जाते.

१) गरीब व होतकरु विद्यार्थी शाळेपासून वंचित राहू नये म्हणून संस्थेकडे जमा होणाऱ्या एण्डाऊमेंडट देणगीच्या व्याजातून वहया पुस्तके दिली जातात. मदत देताना जात - पात धर्म न बघता त्या विद्यार्थ्याला मदत केली जाते.

२) सांगली शि. संस्था लोकमान्य टिळकांच्या चतु:सुत्रीच्या विचाराने प्रभावित होऊन राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन केली आहे. ब्रिटिशांचे ध्येय, धोरणे, राजनिती, लोकांना समजावे म्हणून लो. टिळकांनी 'शिवजयंती' व गणेशोत्सव' साजरा केला होता. विद्यार्थ्यांच्यात एकी निर्माण व्हावी, सामुहिक कार्यक्रम पार पाडावा म्हणून, गणपतीची मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात लेझीम,टीपऱ्या, मंगळागौर यासारख्या कार्यक्रमाने व समाजातील भेडसावणारे प्रश्न उदा. दुष्काळ, अवर्षण, स्त्री भ्रुण हत्या पर्यावरण बचाव, यांचे प्रदर्शन, निबंध स्पर्धा, आयोजित करुन विद्यार्थ्यांच्यात व समाजाला जाणीव निर्माण करुन दिली जाते.

बालनाटय चळवळीच्याव्दारे शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांकडून नाटक बसवून पौराणिक ऐतिहासिक, सामाजिक विषयावरती नाटक सादर करतात. त्याच्यामध्ये शिक्षकही स्वत:काही भुमिका करतात. संस्थेने व शिक्षकांनी अभ्यासक्रमा बरोबर सामाजिक बांधीलकी जपली आहे सप्टेंबर १९९३ मध्ये अनंत चतुर्दशीला लातूर भागात भूकंपाचा मोठा धक्का होता तेंव्हा भूकंपग्रस्तासाठी निधी म्हणून शिक्षकांनी दोन दिवसांच्या पगाराची रक्कम दिली होती. २ संस्था सर्वच कर्मचाऱ्यांना कुटूंब मानते. या कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीला गंभीर प्रसंग निमार्ण झाला की, संस्था पाठीशी उभी असते.

विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रश्नाविषयी देशाच्या जवानांविषयी आत्मीयता कळावी, संरक्षण याविषयी सजग व कृतिशील व्हावे या उद्देशाने लहान गटापासून एन. सी. सी चे पूर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने बनीटमटोला उपक्रम राबविले जातात. प्राथमिक शाळेमध्ये कबबुलबुल,एन. सी. सी सारखे उपक्रम शाळेमध्ये राबविले जातात. १७ ऑगस्ट १९९६ साली सांगली जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री नितीन करीर यांच्याकडे स्कॉलरशीपचे मिळालेले ४१५१ रु राष्ट्रीय सैनिक कल्याण निधीला सूपुर्द केले''. ३'एक मुठ धान्य समाजासाठी' या उपक्रमासाठी गोळा केलेले धान्य मिरजेच्या पाठक अनाथाश्रमाला भेट म्हणून दिले. त्याच्यातून विद्यार्थ्यांची सामाजिक बांधीलकी दिसते.

सायकल सहलीचे आयोजन करुन विद्यार्थ्यांमधील आतील शक्तीला मानसिक सबलता, शरिरीक क्षमता, निसर्गाशी परिचय, रस्त्याच्या कडेने दगडाचा वापर न करता झाडावरती चढून फळे खाणे, सायकल हळू चालविणे, गतिमान करणे, प्रदुषणमुक्त साधनांचा वापर करायला सांगून प्रदुषण कसे रोखायचे याचे धडे दिले जातात. झाडे लावा झाडे जगवा यासारखे उपक्रम ही ढवळेश्वर. ता. खानापूर जिल्हा सांगली या ६५ एकर जागेमध्ये उपक्रम राबविला आहे. महात्मा गांधी विद्यामंदीर व उच्च माध्यमिक विभाग विटा या ठिकाणी एक दिवसीय मोफत सहलीचे आयोजन केले जाते. जे गरीब आहेत. पैशाविना त्यांना सहलीचा आनंद घेता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना आनंद देण्याचा प्रयत्न या सहलीतून केले जाते. माजी विद्यार्थी प्रतिष्ठान व गुरुवर्य गुंडोदासो कंपली प्रतिष्ठान यांच्यामार्फत विद्यार्थ्यांच्यातील स्पर्धा परीक्षेची भिती नष्ट व्हावी. म्हणून आय.ए.एस , आय.पी.

एस अशा व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांत समाजसेवेची आवड उत्पन्न व्हावी म्हणून सधन विद्यार्थ्यांनी कोणत्याही स्वरुपातील मदत पुरवण्याचा नुतन उपक्रम गुरु केला जातो.

सामाजिक जाणिव विद्यार्थ्यांत निर्माण होण्यासाठी इन्फ्लुएंझाच्या साथीत स्वतः संस्थापकांनी विद्यार्थ्यांची सेवा करण्यासाठी पथक उभे केले होते. विनायक राव जोर्शींनी शाळेत मोफत दवाखाना चालविला होता. पूरग्रस्त निधी, अंधनिधी, साहित्य संमेल्लन, शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत, ध्वजनिधीसाठी संस्थेने सढळ हाताने मदत केली आहे.

सांगली शि. संस्थेच्या वर्धापन दिनी रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते. त्याच बरोबर शाळेतूनही रौप्य, हीरक व अमृत, सुवर्ण महोस्तव साजरा करत असताना शाळा ही उपक्रम राबवितात. समाजातील त्या त्या परिस्थितीतील प्रश्न घेऊन संपूर्ण गावातून शिक्षकांच्या समवेत, विद्यार्थी, पालक रॅली काढली जाते. स्वच्छता अभियान, बेटी बचाव बेटी पढाव, बिजली बचत, झाडे लावा, झाडे जगवा, स्त्री भ्रुण हत्या असे सामाजिक प्रश्न लोकांना समजावे म्हणून त्या त्या गावातून रॅली काढली जाते. आज वर्गातील विद्यार्थी सुध्दा एकदा गरीब विद्यार्थी असेल तर त्याला पुस्तके, वहया, भेट म्हणून देण्याचा कार्यक्रम स्वतः करतात.

विद्यार्थ्यांच्यामध्ये जाती - भेद विसरुन, ऐक्याची भावना निर्माण व्हावी, कृतीतून घेतलेले शिक्षण जन्मभर लक्षात राहाते व्यवहाराची ज्ञानाची शिदोरी शालेय जीवनातूनच विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून ''१९१९ पासून सिटी हायस्कूलमध्ये विद्यार्थी सहकारी भांडार सुरु केले होते.'' ४

### *विशेष उपक्रम –*

सांगली शि. सं. १०० वर्ष पूर्ण झाली. म्हणून या शताब्दी निमित्ताने २६ जानेवारी २०१४ मध्ये महालेझीमव्दारे गीनीज बूकमध्ये संस्थेची नोंद झाली.

विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे म्हणून २०१५ मध्ये एक कोटी सूर्यनमस्काराचा उपक्रम राबविला.

२०१६ मध्ये ' एक तरी ओवी अनुभवावी' या ज्ञानेश्वरांच्या श्लोकांचे विद्यार्थ्यांकडून लिखाण करुन घेतले.

अशा तऱ्हेने सतत उपक्रमशील असणारी ही संस्था आहे.

### *मुल्यमापन –*

१) सां. शि. सं. शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक कार्याची धूरा सांभाळताना दिसते.

२) आजची पिढी हीच भविष्यातील समस्यांना तोंड देणारी आहे. तिला आजपासून सक्षम करण्याचा प्रयत्न संस्था व शाळा करताहेत.

३) शिस्त संयम, सहनशीलता, त्यागीवृत्ती, समाजसेवा या सर्व गुणांची विद्यार्थ्यांना जाणिव व्हावी म्हणून उल्लेख करावा लागेल.

४) माजी विद्यार्थी प्रतिष्ठान संघटना तयार करुन शाळेशी सतत संपर्क ठेवून शाळेच्या भविष्याची वाटचाल गतिमान करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

५) रक्तदान करुन समाजाला जीवनात रक्तदानाचे महत्व समजण्यासाठी व रक्तदान केल्याने एखादया रुग्णाचा जीव वाचतो व त्यास आपल्यामुळे एक नवीन आयुष्य मिळते हे समजते.

### *संदर्भ साधने*

१) इतिहास ग्रंथ १९१४- २०१४, प्रकाशक- नितीन गंगाधन खाडिलकर अध्यक्ष सांगली शि संस्था पृष्ठ क्र. ४३५

२) शतपदी - २००४ - २०१३ खंड - १०, कार्यवाह, सांगली. शि. सं. पृष्ठ क्रं. १३२

३) शतपदी १९१४-१९२३ खंड -१, प्रकाशन - कार्यवाह, सांगली शि. संस्था सांगली पृष्ठ क्रं. ४६.